## कार्यकर्ता : सामाजिक प्रश्नांच्या संघर्षासाठी

## **अरुण जाधव**

आमचे कार्यकर्ते तुम्ही पाहिलेत तर त्यांचं शिक्षण कमी दिसेल, पण अनुभव आणि तडफ जोरदार असणार. खर्डा किंवा सोनईसारख्या घटना घडल्या तेव्हा आम्ही पोलीस, मीडिया, राजकीय दबावतंत्र यांचा जितका उपयोग करता येईल तितका केला. म्हणून ते प्रश्न जास्त चर्चेत आले. आता एवढं करूनही खर्ड्यातील हत्याकांडातले साक्षीदार फिरले... आम्ही पुन्हा ती केस रिव्हिजनसाठी दाखल करतोय... भाऊ... व्यवस्था आपला अपमान सारखा करणारच. कोल्हाटी समाजाच्या एका बाईनं आपले दागिने विकून आपल्या पोराला शिकवलं. डॉक्टर केलं. पण त्या पोराला बापाचं नाव नाही म्हणून मेडिकलचं शिक्षण घेणाऱ्यांनी इतकं डिवचलं की, ते पोरगं आत्महत्या करून मेलं.



**अरुण जाधव,**
जामखेड, अहमदनगर
Mob. 9422226066


Date of Publication - 13-01-2018

# प्रश्न नसलेला दिवसच आमच्या वाट्याला येत नाही ...

ॲड.अरुण जाधव हे शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचे भटके-विमुक्त समाजाचे प्रतिनिधित्व करणारे कृतिशील व्यक्तिमत्त्व. टकून्यावर बसला तर अचूक वेध घेणारा नि माया लागली तर पाघळणारा हा काळ्या मातीतल्या ढेकळासारखा रांगडा कार्यकर्ता. रेशनकार्ड नाही, मतदारयादीत नाव नाही, बँकेत खातं नाही, गावात घर नाही नि शहरवस्तीतल्या झोपडपट्टीतही सन्मान नाही- अशा माणसांना आधार देत अरुणभाऊ आपली एक पायवाट चालताहेत. आपल्या ओबड-धोबड जगण्याचा विस्तार करत अरुणभाऊंनी गेल्या दहा वर्षांत अहमदनगरमध्ये एका व्हायब्रंट संघटनेचं बीज रोवलंय. 'लोक अधिकार आंदोलन' या संघटनेमार्फत त्यांचे कार्यकर्ते कुठेही जातीय अन्याय-अत्याचार झाला की, धावून जातात. जातीय अत्याचार प्रतिबंधक कायद्याआधारे ग्रासरूटवर सामाजिक अभिसरणाचं कर्मकठीण काम ही मंडळी करत आहेत.

कोल्हाटी समाजात जन्मलेल्या हिराबाईनं चार अपत्यांना जन्म दिला. दोन मुली व दोन मुलगे. या पोरांना आपल्या वडिलांचं नेमकं नाव-गाव ठाऊक नाही. भटक्या जमातींना ब्रिटिशांनी १८७१ मध्ये कायदा करून जन्मजात गुन्हेगार ठरवलं. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये त्या कायद्यातून भारत सरकारने या जमातींना 'विमुक्त' केलं. अरुणभाऊ मात्र या चोरपणातून मुक्त झाले नव्हते. या मुलाला शाळकरी वयात कुणीही केली नसेल अशी चोरी करावी लागली. नावाची चोरी! त्यांनी आपल्या एका बहिणीच्या 'मालकाचं' नाव चोरलं. गॅझेटियर प्रसिद्ध करून त्यांनी वडिलांच्या नावाठिकाणी एक नाव मिळवलं. पण चळवळीत स्वत्वाचं भान येत गेलं तसतसा हा माणूस जागा झाला. आता ते 'अरुण हिराबाई जाधव' हेच आपलं नाव समाजाच्या नाकावर टिच्चून मिरवताहेत. लोक अधिकार आंदोलन, समता आंदोलन, भारिप बहुजन महासंघ इत्यादी व्यासपीठांवरून ते अत्याचारग्रस्तांची लढाई लढताहेत. पारधी विकास आराखडा मोहीम, कौटुंबिक हिंसाविरोधी अभियान यामार्फत ते वंचितांच्या न्याय्य हक्कांसाठी झटताहेत. त्याप्रमाणेच कला केंद्रांमध्ये नाचणाऱ्या नायकिणींच्या अनाथ बालकांसाठीही निवारा प्रकल्पाचं काम त्यांनी हाती घेतलंय. त्यांच्या या धडपडीची दखल घेऊन महाराष्ट्र फाउंडेशनने वंचिताहून वंचित घटकांच्या प्रश्नांना नव्याने उजाळा दिला आहे....

**प्रश्न** – अरुणभाऊ, पुरस्कारप्राप्त व्यक्तींची मुलाखत म्हटली की, एक टिपिकल प्रश्न मनात येतो... 'हा सन्मान मिळाल्यानंतर तुमच्या मनात कोणत्या भावना आहेत?'

– खरं सांगू का भाऊ...? खरं सांगायची लाज कशाला... बरं वाटतंय!

आजवर आम्हाला धड कुणी शेजारी बससुद्धा म्हटलेलं नाही. चारचौघांत मिरवायची हौस कुणाला नसतीय? सगळ्याला ते आवडतं. पण आम्हाला जी हाडतूड सहन करावी लागतीय, ती कशी सांगू? मी खूप लहान होतो... तेव्हा एका पिराचा दर्गा असलेल्या गावात शाळा शिकायला मला ठेवलेलं. त्या शाळेतली सगळी पोरं माझ्यावर हसायची. मला बापाचं नाव नव्हतं म्हणून... माझी आई एका लग्नाच्या वरातीत नाचत होती. ते कामच ना आमच्या समाजाचं... तर, त्या वरातीत आमच्या गुरुजीलाच मी माझ्या आईला पैसे सोडताना बघितलं... डोळ्यांत पाणी आलं... पण सांगणार कुणाला? ज्या गुरुजींकडून सन्मान शिकायचा, तोच माझ्या माऊलीला हीन बघत होता. आईला व माझ्या मावश्यांना लग्नाच्या वरातीत नाचायची सुपारी मिळायची. मी आईच्या मागं-मागं तिचा पदर धरून जायचो. तिची पिशवी सांभाळायचो. त्या पिशवीत घुंगरं, साडी, मेकपचं सामान

वगैरे असायचं. जिथं सुपारी असायची तिथले लोक आईशी जे बोलायचे ते ऐकून कान बधिर व्हायचे. लय दिसात भेट न्हाई... आमची आठवण येती का न्हाई... आता कधी भेट व्हनार? ही नेहमीची वाक्यं. पण ती कोड्यातली आहेत, हे माझ्या बालमनाला तेव्हाही जाणवायचं. नजरांचे, स्पर्शांचे अर्थ कळायचं वय नव्हतं, पण ते सर्व अपमानजनक आहे, हे मात्र नक्की कळत होतं...

शाळेतले दोस्तही तसंच वागायचे. कारण त्यांना शिकवलेलं- डुकराचं मटण खाणं घाण असतंय...! आता आम्हाला कुठं कळत होतं काय घाण न् काय चांगलं... मुसलमानाची पोरं मोठ्याचं मटण खात्यात. तेबी वाईटच मानायचे की सगळे... पण ती पोरं सगळ्याला चालायची. आम्ही मात्र अस्पृश्य! आम्ही दोस्तांच्या घरी गेलो तर प्यायला पाणी मागायची चोरी! आमच्या एका मामाचं लग्न मला आठवतंय... त्या लग्नातल्या जेवणासाठी सगळा शिधा आम्ही घेऊन दिलेला. अन्न शिजवलं गावकऱ्यांनी. आधी ते जेवले, मंग आमच्या पंगती बसवल्या. म्हंजी, सुखाचा प्रसंग आमचा; तो साजरा करायला आमच्या कष्टाचं गोडधोड अन्न. आमचा बाट होईल म्हणून शिजवणार ते न् तेबी आम्हाला पुन्हा वरून वाढणार! ह्याला काय सन्मानाचं जगणं म्हणायचं? देवळातसुद्धा हे आम्हाला जाऊ देत नसत. आम्हाला प्रश्न पडायचा... आम्हीच काय गुन्हा केलाय?

लांब कशाला, कोपरगाव तालुक्यातल्या पुणतांब्याचा गोळीबार तुम्हाला आठवत असेल. त्या गोळीबारात तीन लोकांना पोलिसांनी गोळी घालून मारलं. प्रदीप दुसिंग हा ख्रिस्ती समाजातला तरुण, इंदुताई मांजरे ही वडार समाजातली महिला आणि जॉन हा कार्यकर्ता. हे मोर्चाने हक्काची जमीन मागायला गेलेले. त्यांना पोलिसांनी सर्वांदेखत कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून गोळ्या घालून ठार केलं. आम्ही दहा-पंधरा कार्यकर्ते त्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी या मागणीसाठी एस.पी. ऑफिसमध्ये गेलेलो. त्याच वेळी फटाक्यांच्या व्यापाऱ्यांचं एक शिष्टमंडळही आलेलं. त्यांना दुकानं मांडायला परवानगी पाहिजे होती. एसपींनी त्यांना वेळ दिला; आम्हाला नाही. का? तर आम्ही म्हणे नेहमीच त्यांना भेटायचो. आमच्या प्रश्नांपेक्षा त्यांना फटाकड्यांच्या दुकानांचा प्रश्न महत्त्वाचा वाटत होता. आणि हे काही अपवादाने घडत नाही. त्यामुळे सन्मानाच्या वागणुकीची आम्हाला समाजाकडून फारशी आशाच राहिलेली नाही... कधी कधी वाटतं, आमच्यासारख्याला सन्मान द्यावा अशी या समाजाची औकात तरी आहे का? पण आपल्या लोकांत आलं की बरं वाटतं. हा पुरस्कार आपल्या लोकांत बसाय-उठायची संधी म्हणूनच मी बघतो. म्हणूनच मला खूप बरं वाटतंय...

**प्रश्न** – यानिमित्ताने तुमच्या चळवळ्या स्वभावाचा सन्मान होत आहे... तुमच्यातला हा चळवळ्या कधी व कसा जागा झाला?

– मी खूपच कमी वयात चळवळीकडे आकर्षित झालो. मी दहावीला शिकत होतो, तेव्हा माझ्या आयुष्याला वळण देणारी एक घटना घडली. तेव्हा मी नुकताच मोटरसायकल चालवायला शिकलो होतो. कुणाची गाडी फिरवायला भेटली की, मला मजा यायची. तर, त्या दिवशी असाच मी मोटरसायकलची फेरी मारायला गेलो. गोरोबा टॉकिजजवळ माझ्याकडून एक अपघात घडला. एका बाईला माझ्या गाडीची ठोकर बसली. त्या बाईच्या कडेवर लेकरू होतं. ते लेकरूही खाली पडून रडायला लागलं. मी घाबरलो. तिथून मी पळून आलो. माझ्याकडून अपघात झाल्याचं कळल्यावर माझी आई व मामाचीही पाचावर धारण बसली. त्यांना वाटलं, 'आता पोरावर पोलीस केस होणार. चांगली शाळा शिकणाऱ्या पोराची जिंदगी बरबाद होणार.' ते घाबरले होते. अशात दारावर पोलीस आला. 'धडक देणारं पोरगं कोल्हाट्याचं होतं' हे कळल्यावर त्या पोलिसालाही चेव आला होता. तो दमदाटी करू लागला. माझी आई गयावया करायला लागली. पदर पसरू लागली. तिच्या विनवण्या बघून पोलिसाचं काळीज विरघळलं नाही. पण त्याची नजर माझ्या बहिणीकडं पाहून पाघळली. त्या हरामखोरानं 'केस काढतो- ह्या पोरीला माझ्याकडे पाठवा' असली नीच मागणी केली. या घटनेमुळं मला आमच्या लाजिरवाण्या जगण्याची तीव्रतेने जाणीव झाली. तोपर्यंत मला मोठं होऊन पोलीस व्हावं असं वाटायचं. पण त्या पोलिसामुळं माझ्या मनात जी चीड बसली, ती अजून गेलेली नाही... पोलिसाने पैसे घेऊन मामला रफादफा केला. पण मी एकदम अस्वस्थ-निराश झालो होतो.

त्या काळात भूतवाडा गावात बंटी सदाफुले या बौद्ध तरुणाने मंदिरप्रवेश केला म्हणून वातावरण तापलं होतं. मानवी हक्क अभियानचे वाल्मिक निकाळजे त्या संघर्षाचं नेतृत्व करत होते. गुलामाला गुलामीची जाणीव झाली की, तो पेटून उठतो म्हणतात. त्याप्रमाणे मलाही जाणीव झाली

होती. मी भूतवाडाच्या संघर्षाकडे आकर्षित झालो. त्या संघर्षात सहभागी असतानाच मी माझ्या मनाच्या निराश अवस्थेची कहाणी वाल्मिकभाऊंना सांगितली. त्यांनी 'त्या फौजदाराविरोधात मोर्चा काढायचा का?' असं सुचवलं. मलाही जोश आला. केवळ पाच कार्यकर्त्यांनी मिळून तो मोर्चा काढला होता. संबंधित फौजदाराला त्या मोर्चाने अद्दल घडली नि माझ्यात चळवळीचं वारं भरलं... हा १९९०-९१ चा काळ.

याचदरम्यानच्या काळात लक्ष्मण गायकवाड यांच्या संपर्कात आल्याने आमच्या जामखेडच्या कोल्हाटी वस्तीत मंदा चंदन यांचं नेतृत्व पुढं आलं होतं. मंदाताईंचं सप्तसूर नावाचं कलाकेंद्र होतं. पण त्या चळवळीतही आघाडी घेऊ लागल्या होत्या. तोपर्यंत मला आमच्या समाजातल्या स्त्रिया केवळ बारीवर नाचतानाच दिसत होत्या. मंदा चंदन यांना मी समाजाच्या विरोधात दंड थोपटताना पाहिलं. एका पारधी पुरुषानं दलित महिलेशी लग्न केलेलं. तो पुरुष वारला. त्यानं जातीबाहेर लग्न केलं म्हणून त्याच्या प्रेताला कुणी हात लावायला तयार नव्हतं. मंदाताईंनी त्या प्रेताचे संस्कार करायचा निर्णय घेतला. आम्ही चार-दोन पोरं त्या अंतिम संस्कारात सामील झालो नि त्याच वेळी मी माझ्या समाजातील अनिष्ट चालीरीतीला मनातल्या मनात अग्नी दिला...

कोल्हाटी बाईच्या मृत्यूनंतर जातपंचायत तिच्या कुटुंबाकडून दंड वसूल करते. तिने नाच केला, हा तिचा अपराध-पाप. म्हणून तिचा अंतिमसंस्कार करण्याआधी तिच्या पापाची भरपाई म्हणून हा दंड वसूल केला जायचा. त्याला तीन देणे असं म्हणतात. तीन रुपयांचा दंड. या अन्यायाविरोधात आम्ही आवाज उठवायचं ठरवलं. मढी, जेजुरी, सोनाळी व माळेगाव इथं जातपंचायती भरतात. आम्ही या जातपंचायतीतल्या कोल्हाटी समाजाच्या प्रमुखांविरोधात पोलिसांत तक्रारी दाखल केल्या. पोलिसांनी त्या पंचांना बोलवलं. त्यांची चौकशी केली. यामुळं जातवाले आमच्यावर खवळले. माझ्यावर, माझ्या कुटुंबावर बहिष्कार टाकला गेला. माझं वय तेव्हा १७-१८ वर्षांचं होतं. घरातून 'जाचपंचायतीची माफी माग' असा खूप दबाव होता. पण चळवळीतले मित्र सुनील जावळे, बापू ओहोळ, अनिल समुद्रे यांनी मला खूप सांभाळलं. ताटातली अर्धी भाकर खाऊ घातली. राहायला आसरा दिला. म्हणून मी चळवळीतच सामील झालो...

**प्रश्न** – म्हणजे सुरुवातीपासूनच तुम्ही जातीय अन्याय-अत्याचारांच्या प्रश्नांकडे वळलात...

– हो... आमचा महत्त्वाचा प्रश्न जातिव्यवस्थेचे चटके हाच होता... त्यामुळं आम्ही आपोआपच त्या प्रश्नांचा सामना करायला लागलो. मानवी हक्क अभियानातून ॲड.एकनाथ आवाड म्हणजे जिजा तेव्हा जोशात होते. आम्ही त्यांच्याकडे पाहूनच संघर्षात उतरलो. जमीन अधिकार आंदोलनाच्या माध्यमातून पारधी समाजाला गायरानांवर अतिक्रमणासाठी संघटित केलं. हा संघर्ष तर संविधानाच्या चौकटीत जातिव्यवस्थेवर सरळ-सरळ केलेला प्रहार आहे. त्या पाठशाळेतच मी कार्यकर्ता झालो.

पण केवळ कार्यकर्त्याला लोक फारसं महत्त्व देत नाहीत. लोकांवर प्रभाव पडावा असंही काय तरी लागतं... म्हणून त्या गरजेतून मी व्हेटर्नरी डॉक्टरची पदवी मिळवली. नावापुढं डॉक्टर हा शब्द लिहू लागलो. पण हेही लक्षात आलं, नुसता प्रभाव पाडून प्रश्न सुटत नाहीत. म्हणून मग कायद्याचंही शिक्षण घेतलं. चळवळीने अन्याय, अत्याचारांशी दोन हात करायला शिकवलं होतं. आयपीसी, सीआरपीसी, रोजगार हमी इत्यादी कायद्यांची माहिती चळवळीतच झाली होती. पण प्रस्थापित समाज कायद्यांना फाटे देऊन अन्यायकारक व्यवस्था कशी चालू ठेवतो, ते कायद्याच्या शिक्षणामुळं समजलं. त्यामुळं आम्ही आता न्याय मिळवताना कायद्यातल्या फटींवरही लक्ष ठेवून असतो...

**प्रश्न** – अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा, सोनई इत्यादी जातीय हत्याकांडांना पटलावर आणण्यात तुमच्या संघटनेने महत्त्वाची भूमिका निभावली आहे, त्याबद्दल सांगा...

– आमच्या संघटनेतले कार्यकर्ते संघर्षातून निर्माण झालेत. ज्यांच्यावर अन्याय झाला, त्यांचे प्रश्न घेऊन संघटना त्यांच्यासोबत उभी राहिली. या लढाईतच कार्यकर्ते घडतात. म्हणून आमचे कार्यकर्ते तुम्ही पाहिलेत तर त्यांचं शिक्षण कमी दिसेल, पण अनुभव आणि तडफ जोरदार असणार. खर्डा किंवा सोनईसारख्या घटना घडल्या तेव्हा आम्ही पोलीस, मीडिया, राजकीय दबावतंत्र यांचा जितका उपयोग करता येईल तितका केला. म्हणून ते प्रश्न जास्त चर्चेत आले. आता एवढं करूनही खर्ड्यातील हत्याकांडातले साक्षीदार फिरले... आम्ही पुन्हा ती केस रिव्हिजनसाठी दाखल करतोय... भाऊ... व्यवस्था आपला अपमान सारखा करणारच. कोल्हाटी समाजाच्या

एका बाईनं आपले दागिने विकून आपल्या पोराला शिकवलं. डॉक्टर केलं. पण त्या पोराला बापाचं नाव नाही म्हणून मेडिकलचं शिक्षण घेणाऱ्यांनी इतकं डिवचलं की, ते पोरगं आत्महत्या करून मेलं. आम्ही ती केस लढलो... ती केस काही मीडियात गाजली नाही... अशा अनेक केसेस आहेत. मीडियात आल्या नाही, म्हणून त्या समाजाला माहीत नसतीलही... पण मला वाटतं, या केसेसच अन्यायाला वाचा फोडणाऱ्या तोफा आहेत... ज्याचं जळतं त्याला बरोबर कळतं... तुम्ही कितीबी दाबून ठेवा... भडका उडणारच...! आज ना उद्या माझ्यासारखे अनेक जण पुढं येणारच आहेत...

**प्रश्न** – भटके-विमुक्त समाजाच्या कळीच्या प्रश्नांबद्दल काही....

– भाऊ... प्रश्न नाहीत असा दिवसच आमच्या वाट्याला येत नाही. पण या समाजाला मुख्य धारेत आणायचं तर शासनाकडं ठोस कार्यक्रम पाहिजे. पारधी विकास आराखडा मोहिमेतून आम्ही हाच प्रयत्न करतोय. पारधी समाजाला संघटित करून त्यांचे प्रश्न त्यांनाच मांडायला सांगतोय. रेशनकार्ड वगैरेंसारखे नेहमीचे प्रश्न येतातच. ते सोडवण्यासाठी खास सल्ला-मार्गदर्शन केंद्र चालवतोय. पण हे प्रश्न मुळापासून सोडवण्यासाठी ठोस धोरण ठरवलं गेलं पाहिजे. त्यासाठी भटके-विमुक्त समाजाची नीट जनगणना झाली पाहिजे. आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र बजेट मांडले पाहिजे. शेतीसाठी, आरोग्यासाठी स्वतंत्र बजेट पाहिजे अशा मागण्या होत असतात. काही प्रदेश किंवा समाजघटकही स्वतंत्र बजेटची मागणी करतात. त्यामुळे कोणाकोणासाठी स्वतंत्र बजेट मांडायचे असे काही लोक म्हणतील. मग तरीही आमची मागणी कशासाठी? तर बजेटमधील तरतूद अन्यत्र वळवली जाऊ नये, भटक्या-विमुक्तांसाठीच खर्च व्हावी यासाठी. यातला अडसर महाराष्ट्रातल्या मातब्बर जातींचाच आहे. भटके-विमुक्तांची जनगणना झाली तर विधीमंडळात, नोकऱ्यांमध्ये या समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान द्यावं लागेल. सध्या ज्या जातीचं वर्चस्व आहे, त्यांना हा धोका पत्करायचा नाही. हीच आमची कळीची समस्या आहे...

**प्रश्न** – तुम्ही सुरू केलेल्या निवारा प्रकल्पाबद्दल...

– भाऊ, जामखेड हे गाव कलाकेंद्रांसाठी प्रसिद्ध आहे. पूर्वी कोल्हाटी समाजातल्या महिलाच या कलाकेंद्रांमधून उपजीविका चालवायच्या. आता मुस्लिम, बौद्ध, मातंग व भटके-विमुक्त समाजात न मोडणाऱ्या महिलाही या व्यवसायात येऊ लागल्यात. का? कारण की, समाजात वाढायला लागलेले अन्याय-अत्याचार! अत्याचारपीडित महिला आसरा शोधत कलाकेंद्रात येते. शौकिन लोक त्यांची कला बघतात. पण त्या महिलांच्या पोरांच्या भविष्याची पर्वा कोण करणार? मी अशी मुलं नेहमी पाहत होतो. आई नाचत असताना ही पोरं तिथंच घुटमळायची. गिऱ्हाइकांना सिगारेट-गुटखा आणून द्यायची. अशा चार-पाच पोरांसाठी मी सुरुवातीला वसतिगृहाची सुरुवात केली. मग लक्षात आलं- खेड्यात अनेक अनाथ मुलं शिक्षणावाचून अशीच बेसहारा जिंदगी काढायला लागलेत. पाहता-पाहता आमच्याकडं पंधरा गावांतली अशी वीस मुलं आली. त्यांच्यासाठी निवासी वस्तीशाळा म्हणजे आमचा निवारा प्रकल्प. त्यासाठी आम्ही धडपडत आहोत. विशेष म्हणजे या पोरांच्या शिक्षणासाठी बहुरूपी समाजातली पोरं महाराष्ट्रभरातून मदतनिधी जमवत आहेत. हे बहुरूपी पोलिसाचा वेश करून भीक मागायचे. पण लोक आता या कलेला भाव देत नाहीत. बहुरूप्याला रुपया द्यायचीही लोकांची दानत नाही. पण या कलाकार मुलांनीच आता निवारा प्रकल्पासाठी मदतनिधी जमवण्याची जबाबदारी घेतली आहे. ते सरकारी कचेरीत, दुकानदारांकडे जिथं कुठं उदार मनाचा माणूस भेटेल त्याला आपल्या उपजत कलेच्या माध्यमातून आपल्या बांधवांच्या शिक्षणाची गरज सांगतात. रीतसर पावती देऊन मदत घेतात. या मदतनिधीतली काही रक्कम त्यांच्या उदरनिर्वाहाला मदत करतेच; पण महत्त्वाचं हे आहे की, काही अनाथ मुलांच्या भवितव्याची घडणही त्यामुळे होत आहे. असा एक ताळमेळ घालून आम्ही आमचं काम करतोय...

**प्रश्न** – अरुणभाऊ, तुम्ही व तुमच्या संघटनेतील कार्यकर्त्यांनी केलेले संघर्ष, लढवलेल्या केसेस यांचं चांगलं डॉक्युमेंटेशन तुम्ही केलंय... खरंच याचं पुस्तक केलंत तर चळवळीसाठी तो महत्त्वाचा दस्तावेज ठरेल, असं वाटत नाही का?

– कार्यकर्त्यांची हीच तर अडचण आहे ना भाऊ... लढायचं का फायली ठेवायच्या...? पण कुणी तरी हे डॉक्युमेंटेशन करायला पाहिजे... आज खर्डा केसमध्ये काय घडलं... सोनई हत्याकांडाचा निकाल काय लागणार? याचा नीट पाठपुरावा करून ही व्यवस्था आमच्याशी कशी वागते याच्या नोंदी ठेवल्या गेल्या, तर

पुढं कधी तरी त्या नक्की उपयोगात येणार...

**प्रश्न –** अखेर तुमच्या सध्याच्या सुरू असलेल्या काही उपक्रमांबद्दल सांगा...

– भाऊ खूप वेगवेगळ्या पातळ्यांवर आम्ही काम करतोय. एकीकडं रोज अन्याय अत्याचाराच्या घटना घडतात. रोज त्यामागं धावपळ करावीच लागती. आता बघा भीमा कोरेगावची घटना ताजी आहे. ही दंगल मुख्य कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यंत पोचली असती तर काय घडलं असतं त्याची कल्पनाही करवत नाही. आता या घटनेच्या फॅक्ट फायंडिंग कमिटीत आम्ही लक्ष घालतोय, तर हे सगळं सुरूच राहणार... पण तेवढ्यावर थांबून चालत नसतं ना भाऊ... आपल्याला, समाजाला घडवायचंय... प्रस्थापित समाज अन्याय-अत्याचार करतो तसं आपल्या समाजातही अन्यायाचा कळस गाठला जातोच ना... आता बघा आम्ही श्रीगोंदा तालुक्यात कौटुंबिक हिंसा मुक्ती अभियान दहा गावांमध्ये राबवतोय. या अभियानातून आम्ही १००० कुटुंबांना जोडलंय.

भाऊ, कौटुंबिक हिंसा म्हटलं की, आपल्या डोळ्यांपुढं नवरा-बायकोची घरगुती भांडणं असं काहीतरी येतं... पण आम्ही ज्या भटके-विमुक्त महिलांच्या प्रश्नांवर काम करतोय तिथली तऱ्हाच निराळी. शेजारच्या बाईच्या अंगात देव येतो, माझ्याच बायकोच्या अंगात देव का येईना... हिला पाळीच का येईना... ही भानामतीच करती... आता बघा हा समाजभटकंती करतो... तर एखाद्या मुलीला नाही आवडत असं वणवण करायला तर तर हिचं गावात कुणासंगट लफडं असंल म्हणूनच ही आमच्यासोबत भटकायलं नगं म्हणतीय... असल्या कारणांनी बायकांना टाकलं जातं. बरं एकदा का बाईला सोडलं की तिनं पुन्हा म्हणून लग्न करायचा नाही असला जुलमी न्याय... बाईला जातपंचायतीसमोर आणून जिभेनं विष्ठा उचलायला लावायची, दातात चप्पल धरायला लावायची, तापत्या तेलातून पैसा काढायला लावायचा, असल्या शिक्षा पत्कराय लावल्या जातात. तर आम्ही बाईवर होणाऱ्या या हिंसेविरूद्ध जनमानस घडवायचं काम करतोय. या कामातून आम्ही आजवर साधारणत: ६० तरी जोडप्यांना पुन्हा सलोख्यानं नांदायला राजी केलंय. जातपंचायतींच्या ढवळाढवळीशिवाय. या प्रोसेसमध्ये तयार झालेल्या मुली डोळे दिपतील अशी कामं आज करू लागल्यात. पारधी समाजाच्या काजल पवार, दुर्गा पवार, श्रुती भोसले या मुली अशाच प्रोसेसमधून पुढं आल्या. या मुली अशा तयार झाल्या की श्रीगोंदा तालुक्यात एका बौद्ध समाजाच्या मुलीवर अत्याचार झाला होता. तेव्हा या पारधी समाजातल्या मुलींनी आवाज उठवला. ही काय साधी गोष्ट आहे का?

दुसरा आमच्या कामाचा पैलू आहे पुनर्वसनाचा. श्रीगोंदा तालुक्यात बिरमाली नंदीवाले समाजाची शंभर-दीडशे लोकांची वस्ती. या वस्तीला त्यांच्या जातीनं बहिष्कृत केलं होतं. का? तर ५० वर्षांपूर्वी या वस्तीतल्या कुणीतरी आंतरजातीय विवाह केलेला. आम्ही या वस्तीवरचा बहिष्कार काढण्यासाठी झटतोय. हे झालं समाजांतर्गत बहिष्कार काढण्याचं काम. पण बाहेरच्या समाजानं जे आम्हाला अघोषितपणे बहिष्कृत केलंय त्याचं काय? तर तो बहिष्कार निर्मूलन करण्यासाठीही आम्ही काही कामं करतोय. त्याचं उदाहरण द्यायचं झालं तर पारधी समाजातल्या पोरांच्या पोलिस भरतीच्या एका उपक्रमाबद्दल सांगता येईल. पोलिस नि पारधी हे साप-मुंगसाचं नातं आहे. पोलिस अजूनही चोरी झाली की पारधी पोरांना उचलतात. ही मानसिकता बदलण्यासाठी आम्ही पोलिस, आदिवासी विकास विभाग व वनविभाग मिळून एक उपक्रम चालवतोय. या उपक्रमातून नुकतीच १५० पारधी समाजातल्या तरुणांची निवड केली. या पोरांना पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण आम्ही दिलं. यातल्या काही पोरांवर गैरसमजातून गुन्हे दाखल झाले होते. त्या गुन्ह्यांच्या कलंकातून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून आम्ही पोलीस-न्याययंत्रणेला सोबत आणलं. पोरांवरचे गुन्हे काढले नि त्यांनाच आता पोलिस भरतीचं प्रशिक्षण देतोय. विशेष म्हणजे या उपक्रमात ३५ पारधी समाजातल्या मुलीही आहेत. ही पोरं-पोरी उद्या पोलिस होतील तेव्हा पारंपारिक गुन्हेगारीचा कलंक पुसून टाकायला तेच पुढाकार घेतील. पण तो दिवस अजून खूप दूर आहे... तोवर आम्ही आपलं रोज नवनव्या लढाया लढत राहणार...दुसरं काय करणार?

संवादक : प्रशांत खुंटे
Mob. 9764432328